**प्रकल्प प्रवर्तक मे. ओलम ग्लोबल एग्री कमोडीज इंडिया प्रा. लिमिटेड यांच्या गट नं. ७६, ७६/१, ७६/२/१, ७६/२/२, ७५७, मुक्काम पोस्ट-चेन्नेहट्टी, राजगोळी (खुर्द), तालुका-चंदगड, जिल्हा - कोल्हापूर -४१६ ५०८, महाराष्ट्र येथील कार्यरत साखर कारखान्यात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता ४,९६०.० टन प्रतिदिन ते १०,०००.० टन प्रतिदिन पर्यत, सहवीज प्रकल्प २५.० मे.वॅट पासून ३३.० मे. वॅट पर्यत आणि बी-२ श्रेणी अंतर्गत मंजूर ३००.० किलो लिटर प्रतिदिन धान्यकणांवर आधारित आसवणी प्रकल्पामध्ये मोलॅसिस (बी आणि सी)/केन सिरप यांचा वापर करुन ३००.० किलो लिटर प्रतिदिन आर.एस./इ.एन.ए./इथेनॉल यांचे उत्पादन आणि धान्य कणांपासून आर.एस./इ.एन.ए./इथेनॉल यांचे उत्पादन, तसेच ८.० मे.वॅट वीज निर्मिती प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त —**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. ओलम ग्लोबल एग्री कमोडीज इंडिया प्रा. लिमिटेड यांच्या गट नं. ७६, ७६/१, ७६/२/१, ७६/२/२, ७५७,मुक्काम पोस्ट-चेन्नेहट्टी, राजगोळी (खुर्द), तालुका-चंदगड, जिल्हा- कोल्हापूर - ४१६ ५०८, महाराष्ट्र येथील कार्यरत साखर कारखान्यात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता ४,९६०.० टन प्रतिदिन ते १०,०००.० टन प्रतिदिन पर्यत, सहवीज प्रकल्प २५.० मे.वॅट पासून ३३.० मे. वॅट पर्यत आणि बी-२ श्रेणी अंतर्गत मंजूर ३००.० किलो लिटर प्रतिदिन धान्यकणांवर आधारित आसवणी प्रकल्पामध्ये मोलॅसिस (बी आणि सी)/केन सिरप यांचा वापर करुन ३००.० किलो लिटर प्रतिदिन आर.एस./इ.एन.ए./इथेनॉल यांचे उत्पादन आणि धान्य कणांपासून आर.एस./इ.एन.ए./इथेनॉल यांचे उत्पादन, तसेच ८.० मे.वॅट वीज निर्मिती प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक १२ जून, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थळ - कामगार वसाहतीसमोरील मैदान, मे. ओलम ग्लोबल एग्री कमोडीज इंडिया प्रा. लिमिटेड, गट नं.७६, मुक्काम पोस्ट-चेन्नेहट्टी, राजगोळी (खुर्द), तालुका-चंदगड, जिल्हा – कोल्हापूर – ४१६ ५०७, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री प्रमोद माने, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री अमोल येडगे,भाप्रसे, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर सुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर, श्री जगन्नाथ शं सांळुखे, सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. कोल्हापूर प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

श्री प्रमोद माने, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर तथा आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए – साखर उत्पादन - ५ (जे), सहविद्युत प्रकल्प – १ (डी) आणि आसवणी – ५ (जी) अंर्तगत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे. आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

त्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २७-०१-२०२४ रोजी सादर केला व त्यास अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक १२-०२-२०२४ रोजी प्रदान केली. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांनी प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन शासनास सादर केलेला आहे.

श्री प्रमोद माने, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर तथा आयोजक यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. ओलम ग्लोबल एग्री कमोडीज इंडिया प्रा. लिमिटेड, यांनी त्यांच्या गट नं.७६, ७६/१, ७६/२/१, ७६/२/२, ७५७, मुक्काम पोस्ट-चेन्नेहट्टी, राजगोळी (खुर्द), तालुका-चंदगड, जिल्हा – कोल्हापूर – ४१६ ५०८, महाराष्ट्र येथील कार्यरत साखर कारखान्यात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता ४,९६०.० टन प्रतिदिन ते १०,०००.० टन प्रतिदिन पर्यत, सहवीज प्रकल्प २५.० मे.वॅट पासून ३३.० मे. वॅट पर्यत आणि बी-२ श्रेणी अंतर्गत मंजूर ३००.० किलो लिटर प्रतिदिन धान्यकणांवर आधारित आसवणी प्रकल्पामध्ये मोलॅसिस (बी आणि सी)/केन सिरप यांचा वापर करुन ३००.० किलो लिटर प्रतिदिन आर.एस./इ.एन.ए./इथेनॉल यांचे उत्पादन आणि धान्य कणांपासून आर.एस./इ.एन.ए./इथेनॉल यांचे उत्पादन, तसेच ८.० मे.वॅट वीज निर्मिती प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास रितसर अर्ज देण्यात आला होता. सदरील अर्जाच्या अनुषंगाने सहसंचालक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी दिनांक २६.०२.२०२४ रोजीच्या पत्रानुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली होती.

सदरील सूचनेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास बुधवार , दिनांक १२ जून, २०२४ रोजी दुपारी १२. ०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-१८३/२०२४ पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२४०५१७-एफटीएस०१४४ दिनांक १७-०५-२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर, - **अध्यक्ष**

किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई - **सदस्य**
यांचे प्रतिनिधी —
प्रादेशिक अधिकारी -कोल्हापूर,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार (वेळोवेळी सुधारित) संबंधित प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जनसुनावणीस मा. जिल्हाधिकारी,कोल्हापूर यांनी मान्यता दिल्यानंतर जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत, तर एक राष्ट्रीय वृत्रपत्रात इंग्रजी भाषेत जनतेच्या माहितीसाठी पर्यावरणविषयक जाहिर सूचना प्रकाशित करणे बंधनकारक आहे. सदरहू अधिसूचनेनुसार प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक पुढारी यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक ०९ मे, २०२४ रोजी जनसुनावणीबाबत जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ खालील अधिसूचित (notified) शासकीय कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होता —

१) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर,
२) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर,,
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, कोल्हापूर,
४) उप विभागीय अधिकारी, गडहिंग्लज, तालुका- गडहिंग्लज, जिल्हा — कोल्हापूर,
५) तहसीलदार, तहसील कार्यालय- चंदगड, तालुका- चंदगड, जिल्हा- कोल्हापूर,
६) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, चंदगड, तालुका- चंदगड, जिल्हा- कोल्हापूर,
७) सरपंच/ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय — चेनेहट्टी — राजगोळी (खुर्द), राजगोळी (बुद्रुक), डिंडालकोप, तालुका- चंदगड, जिल्हा- कोल्हापूर,
८) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२.
९) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२
१०) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर — ४१६ ००३
११) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर — ४१६ ००३

१२)     संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

त्यापुढे श्री प्रमोद माने, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर तथा आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. तसेच जन सुनावणीस उपस्थित असणा-यांनी केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, बैठकीचे इतिवृत, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडून पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यापुढे आयोजक यांनी पुढील कामकाज सुरु करण्याविषयी मा. अध्यक्ष तथा जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर यांना विनंती केली.

मा. अध्यक्ष तथा जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सांगितले की, या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीमध्ये जी चर्चा होईल त्याची जशीच्या तशी नोंद घेवून आम्ही इतिवृत्त शासनाकडे सादर करणार आहे कोणताही निर्णय घेणार नाही, त्याबाबतचा निर्णय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय घेणार आहे. त्यापुढे त्यांनी सांगितले की, प्रथम प्रस्तावित प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार माहिती देतील त्यानंतर आपण आपल्या तक्रारी, सूचना, हरकत मांडावा तसेच लेखी निवेदन स्विकारले जाईल. उपस्थितांकडून टिका, टिप्पणी व आक्षेप नोंदवण्यावेळी प्रत्येकाने आपले संपूर्ण नाव व पत्ता सांगून तदनंतर त्यांनी त्यांचे टिका, टिप्पणी व आक्षेप नोंदवावे असे सांगितले. यानंतर मा. अध्यक्षांनी प्रस्तावित प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांना माहिती सादर करण्याची विनंती केली.

यानंतर कारखान्याचे तांत्रिक सल्लागार यांच्यावतीने प्रस्तावित प्रकल्पाबाबत स्लाईड शो व्दारे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. ओलम ग्लोबल एग्री कमोडीज इंडिया प्रा. लिमिटेड यांनी त्यांच्या गट नं. ७६, ७६/१, ७६/२/१, ७६/२/२, ७५७, मुक्काम पोस्ट-चेन्नेहट्टी, राजगोळी (खुर्द), तालुका-चंदगड, जिल्हा- कोल्हापूर- ४१६ ५०८, महाराष्ट्र येथील कार्यरत साखर कारखान्यात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता ४,९६०.० टन प्रतिदिन ते १०,०००.० टन प्रतिदिन पर्यत, सहवीज प्रकल्प २५.० मे.वॅट पासून ३३.० मे. वॅट पर्यत आणि बी-२ श्रेणी अंतर्गत मंजूर ३००.० किलो लिटर प्रतिदिन धान्यकणांवर आधारित आसवणी प्रकल्पामध्ये मोलॅसिस (बी आणि सी)/केन सिरप यांचा वापर करुन ३००.० किलो लिटर प्रतिदिन आर.एस./इ.एन.ए./इथेनॉल यांचे उत्पादन आणि धान्य कणांपासून आर.एस./इ.एन.ए./इथेनॉल यांचे उत्पादन, तसेच ८.० मे.वॅट वीज निर्मिती प्रकल्प प्रकल्पाचे नियोजन केलेले असून सदरहू प्रकल्प हा पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए – साखर उत्पादन - ५ (जे), सहविद्युत प्रकल्प – १ (डी) आणि आसवणी – ५ (जी) अंतर्गत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांची

"पयावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे, प्रकल्पातील आसवणी क्षमता ही ३००.० केएलपीडी असून आंतर-राज्य (महाराष्ट्र-कर्नाटका) सीमा ही प्रकल्प स्थानापासून ५.० कि.मी. आत असल्याने सदरहू प्रकल्पाचा केंद्रीय स्तरावरच विचार करण्यात येत असल्याचे सांगितले.

त्यापुढे प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी कार्यरत प्रकल्प व प्रस्तावित प्रकल्प यातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सविस्तर माहिती दिली. प्रस्तावित प्रकल्पात साखर कारखाना व सहवीज निर्मितीसाठी गुंतवणूक ही रुपये ८४.५४ कोटी तर आसवणी प्रकल्पासाठी रुपये १५.० कोटींची गुंतवणूक करणार असून जरी भारत सरकारच्या निर्देशांप्रमाणे प्रकल्प क्षेत्राच्या ३३% हरितपट्टा विकसित करणे बंधनकारक असले तरी प्रकल्प व्यवस्थापनाने ३८% हरितपट्टा विकसित केलेला आहे. साखर कारखाना वर्षात १८० दिवस तर आसवणी प्रकल्प ३३० दिवस कार्यरत राहणार आहे. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा झेडएलडी – शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प असून शेतक-यांच्या हिताचा प्रकल्प आहे. प्रकल्पात पर्यावरण संरक्षणासाठी ४३.३५ कोटींची तरतूद केलेली असून कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधीसाठी ४.५० कोटी रुपयांची तरतूद केलेली असल्याचे सांगितले. यामध्ये प्रकल्पाची प्रस्तावना, प्रकल्पाचे वर्णन, प्रकल्पाचे स्थान, सामान्य स्थान दर्शविणारा नकाशा, विशिष्ट स्थान आणि प्रकल्प सिमा दर्शविणारा नकाशा, प्रकल्पाचा ले आऊट प्लॅन, स्त्रोत आवश्यकता आणि पायाभूत सुविधा, आवश्यक वीज, पाण्याची आवश्यकता, कारखान्याची पाण्याची आवश्यकता व सांडपाणी निर्मिती, साखर विभाग सांडपाणी प्रक्रिया, साखर विभाग कन्डेन्सेट प्रक्रिया, आसवणी विभाग व वीज निर्मिती प्रकल्प कन्डेन्सेट प्रक्रिया, घरगुती सांडपाणी प्रक्रिया, आसवणी विभाग सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा, हवा उत्सर्जन व्यवस्थापन, विद्यमान तसेच प्रस्तावित केलेल्या बॉयलर आणि त्यातील हवा प्रदूषण नियंत्रण संयंत्रणेसाठी लावण्यात येणा-या उपकरणांचा तपशील, घनकचरा व्यवस्थापन, घातक कचरा, हवा पर्यावरण, प्रस्तावित क्रिया प्रक्रियामुळे हवेच्या गुणवत्तेवर होणारा प्रभाव, पीएम १०, पीएम २.५, एसओ२, एनओएक्स, इ. बाबत वाढीव प्रमाणासाठी प्रमाण विशेष आकृती, जल विश्लेषण व परिणाम, अभ्यासाच्या क्षेत्राच्या १० किमी परिघात मातीच्या विश्लेषणाचा अहवाल, ध्वनी वातावरण, अभ्यास क्षेत्रातील जमिनीचा वापर, कारखान्याची छायाचित्रे, कारखान्यातील हरितपटटा दर्शविणारी छायाचित्रे, पर्यावरण व्यवस्थापन योजनेच्या दिशेने अर्थसंकल्पात तरतूद, सामुदायिक पर्यावरण उत्तरदायित्व योजना, रेनवॉटर आणि स्टॉर्मवॉटर संवर्धन योजना, निष्कर्ष इ. बाबत माहिती सादर केली. सादरीकरणाची छायांकित प्रत सोबत सहपत्र १ म्हणून जोडत आहे.

त्यापुढे श्री प्रमोद माने, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर तथा आयोजक यांनी पर्यावरणविषयक जाहिर सूचना प्रकाशित केल्यानंतर, तसेच शासनाच्या अधिसूचित (notified) विविध कार्यालयात आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर प्रस्तावित प्रकल्पाचा कार्यकारी सारांश अहवाल हा इंग्रजी व मराठी भाषेत उपलब्ध केल्यानंतर उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांना ०२ (दोन) सूचना/टीकाटिप्पणी प्राप्त झालेल्या आहेत. त्याखालीलप्रमाणे आहेत-

१) त्यापैकी एक सूचना/टीकाटिप्पणी **ग्रामपंचायत कार्यालय, राजगोळी (खुर्द), तालुका-चंदगड, जिल्हा-कोल्हापूर** यांच्याकडून प्राप्त झालेली आहे. ग्रामसेवकांनी ती सूचना/टीकाटिप्पणी सादर केलेली आहे. त्यांनी आक्षेप नोंदविलेला आहे की –

अ) सध्या कार्यरत प्रकल्पात बगॅसपासून जो धूर उत्पन्न होतो, त्यातून धुलीकण परिसरात पडतात. तरी प्रस्तावित प्रकल्पात धुलीकण अटकाव करण्यासाठी आधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा उभारुन ती कार्यक्षमतेने हाताळण्यात यावी,

ब) प्रकल्पात येणा-या-जाणा-या गाड्यांना संगित यंत्रणा (music system) लावलेली असते व वाहनचालक त्यावर गाणी दिवसा-रात्री मोठ्याने लावून प्रकल्पात जाणे-येणे करत असतात, त्यामुळे गावातील लोकांना विशेषतः लहान मुले, आजारी व्यक्ती व वरिष्ठ नागरीक यांना त्रास सहन करावा लागतो.

क) प्रकल्प प्रवर्तक पाणी शिंपडण्यासाठी प्रकल्पातील पाणी वापरतात, ते केमिकलयुक्त असते.

२) दुसरी सूचना/टीकाटिप्पणी ईमेलव्दारे **श्री सुनंदा रेड्डी, तेलंगणा, पर्यावरणवादी** यांच्याकडून प्राप्त झालेली आहे त्यामध्ये त्यांनी सूचना केलेली आहे की प्रस्तावित प्रकल्पामुळे परिसरातील लोकांना प्रदूषणाचा त्रास होऊ नये, त्यासाठी प्रस्तावित प्रकल्पात सर्व प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित केल्यानंतर त्या कार्यक्षमतेने वापरण्यात याव्यात व प्रकल्पाने कुठल्याही परिस्थितीत प्रदूषण करु नये. सदरील प्रकल्पामुळे आजुबाजूच्या परिसरातील लोकांना होणा-या फायदयाचा विचार करता सदरील प्रकल्प चालू केल्यास उपयुक्त होईल असे म्हणणे दिलेले आहे.

त्यावर मा. अध्यक्ष तथा जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर यांनी ग्रामपंचायत राजगोळी (खुर्द), यांचे प्रतिनिधींच्या उपस्थितीबाबत विचारणा केली असता सदर ग्रामपंचायती मार्फत उपस्थित प्रतिनिधींनी खालील प्रमाणे प्रश्न उपस्थित केला.

१) **श्री संतोष दिवसे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत राजगोळी (खुर्द),तालुका-चंदगड, जिल्हा-कोल्हापूर** यांनी सांगितले की आम्ही ईमेल व्दारे देण्यात आलेल्या एकूण आठ सूचना सादर केलल्या आहत. त्याबाबत अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना ग्रामपंचायत राजगोळी (खुर्द) यांनी सादर केलेल्या सूचनांना स्पष्टीकरण करण्यास सांगितले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःसारण (ZLD) प्रकल्प असून प्रकल्पात प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येणार आहे त्यामुळे प्रकल्पाबाहेर प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाच्या बाहेर सोडण्यात येणार नाही. वाहनांच्या वाहतुकीमुळे गावात धूळ उडत असते, त्यासाठी त्या धुळीवर पाणी शिंपडण्याची संयंत्रणा बसविण्यात आलेली आहे त्यापुढे ही आता सदरील रस्ते दुरुस्त करण्यात आलेले असून ते खराब झाल्यास कारखाना रस्त्यांची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी घेत आहे.

त्यापुढे पर्यावरण सल्लागार यांनी स्टॅक/चिमणीतून राख परिसरात पडते या आक्षेपास उत्तर देताना सांगितले की कार्यरत प्रकल्पात इलेक्ट्रो-स्टॅटिक-प्रेसिपरेटर (ईएसपी) प्रकल्पातील स्टॅक/चिमणीस बसविण्यात आलेला असून त्याची पर्याप्तता (adequacy) तपासण्यात येईल तसेच त्यामध्ये जरुर वाटल्यास ईएसपीत सुधारणा (upgradation) करण्यात येईल, जेणेकरुन स्टॅक/चिमणीतून राख परिसरात पडणार नाही. तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेली मानके पाळण्यात येतील. प्रस्तावित प्रकल्प उभारताना सद्यस्थितीमध्ये असलेल्या

ईएसपी तीन फिल्डचा चार किंवा पाच फिल्ड्सपर्यंत सुधारणा (upgradation) करण्यात येईल. त्याप्रमाणे प्रस्तावित प्रकल्पात नविन ईएसपी हे सर्व पारित मानके पाळतील तेवढ्या फिल्डचीच उभारणी करण्यात येणार आहे त्यामुळे धुळीकण/राख ही प्रकल्प परिसरात पडणार नाही. पर्यावरण सल्लागार यांनी पुढे सांगितले की प्रकल्पात येणा-या व जाणा-या गाड्यांचे वाहनचालक हे संगीत यंत्रणेमध्ये (music system) गाणी दिवसा-रात्री मोठ्याने लावत असल्यामुळे होणा-या त्रासासाठी कारखाना प्रशासनाकडून संबंधित वाहन चालकांना ताकीद देण्यात येईल. तसेच प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पात जल, वायू, ध्वनी प्रदूषण नियंत्रणाची पूर्णपणे काळजी घेण्यात येईल.

त्यापुढे अध्यक्षांनी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे असे सांगितले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न, सूचना, आक्षेप व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **<u>अहमदजुबेर अब्दुल अजीज काझी, उपसरपंच, मुक्काम-तळगुळी, तालुका-चंदगड, जिल्हा-कोल्हापूर:-</u>**

सदरील व्यक्तीने खालीलप्रमाणे प्रश्न उपस्थित केले,

- जरी सदरहू प्रकल्प चांगला आहे, त्याचा फायदा होईल. मात्र बॉयलरसाठी कुठले इंधन वापरण्यात येईल, त्याची सुरक्षितता व प्रदूषण नियंत्रणासाठी कुठली सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे याची संपुर्ण माहिती सांगण्यात यावी.
- सामाजिक व आर्थिक विकासासाठी ४.५० कोटींचा सीएसआर निधी राखीव ठेवणार आहेत, त्या निधिचा वापर हा कुठल्या अंतरापर्यंत लोकांसाठी करण्यात येणार आहे?
- उत्पन्न होणारी वीज ही संपूर्णपणे शासनास देणार आहेत का येथील स्थानिकांना वापरण्यास देणार आहेत?
- माझी विनंती कंपनीस आहे की मका, ज्वारी, ऊस या पीकांना पाणी लागते. तर येथील कामोळीवाडी धरणास गळती लागलेली आहे. त्यामुळे मार्च, एप्रिलमध्ये पाण्याची टंचाई ही बरीच वाढते व एप्रिलमध्ये पाणी कमी होते. सदरील पाण्याच्या तुटवडयामुळे आम्ही वर्षभर जे पिक मोठे करण्यासाठी राबतो ते एप्रिलमध्ये पाणी मिळत नसल्यामुळे आमचा ऊस सुकतो. तरी त्यावर उपाय म्हणून कारखान्याने नविन धरणासाठी प्रयत्न करण्यात यावा असे नमुद केले.

त्यावर पर्यावरण सल्लागार यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली,

- प्रकल्पात इन्सिनरेशन बॉयलर व त्यास स्टॅक/चिमणी उभारण्यात येणार आहे, त्यामध्ये स्पेंट वॉश बगॅसमध्ये मिक्स करुन ते इंधन म्हणून वापरण्यात येईल. त्यामध्ये वापरण्यात येणारा बगॅस हा कृषि आधारित (agro based) असून त्यामध्ये सल्फरचे प्रमाण कमी आहे त्यामुळे बगॅसपासून जी राख

मिळेल, ती २-३ टक्केच असेल. सदरील इन्सीनरेशन बॉयलर व इतर बॉयलरसाठी अद्यावत हवा प्रदूषण नियंत्रण संयत्रणा म्हणजे ईएसपी (इलेक्ट्रो-स्टॅटिक-प्रेसिपरेटर) उभारण्यात येणार आहे ज्याची कार्यक्षमता ९९.९% आहे. त्यामुळे सदरील ईएसपी मुळे राख ही बाहेर पडणार नाही तसेच सदरील ईएसपीची पर्याप्तता (adequacy) तपासण्यात येईल. तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेली मानके पाळण्यासाठी सदरहू ईएसपीच्या फिल्ड्सचा अभ्यास करुन सुधारणा (upgradation) करण्यात येईल. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पात जल, हवा, ध्वनी, घातक घनकचरा प्रदूषण नियंत्रणयाबाबत योग्य ते उपाययोजना करण्यात येतील व याबाबत शासनाची मानके पाळण्यात येतील.

- त्यापुढे त्यांनी सांगितले की प्रकल्प स्थानाच्या १०.० कि.मी. परिघात असणा-या ग्रामपंचायतीसाठी सदरहू सीएसआर निधी विविध सामाजिक व आर्थिक विकासासाठी वापरण्यात येणार आहे. सदरील प्रस्तावित प्रकल्प उभारणास सुमारे दोन वर्षाचा कालावधी लागेल, त्यानंतर प्रकल्प पूर्ण कार्यान्वित झाल्यानंतर टप्याटप्याने प्रकल्प नफ्यात आल्यानंतर पुढील पाच वर्षात सदरील सीएसआर निधी खर्च करण्यात येईल.
- तसेच वीज निर्मिती झाल्यानंतर प्रथम ती प्रकल्पात मोटर्स, कॉम्प्रेसरसाठी वापरण्यात येईल, कारण आम्हांला उच्च दाबाची वीजेची आवश्यकता आहे. ती वापरल्यानंतर उर्वरित वीज ग्रीड व्दारे शासनाला देण्यात येईल असे सांगितले.
- चौथ्या मुदयाबाबत नविन धरणासाठी कारखान्यामार्फत प्रयत्न करण्यात यावा या सूचनचा नोंद घेण्यात आलेली आहे असे सांगितले.

**२) श्री विठ्ठल भाऊसाहेब पाटील, मुक्काम पोस्ट-शट्टीहळी, जिल्हा-बेळगावी, कर्नाटका:-**

सहवीज प्रकल्पाचे विस्तारिकरण नियोजित आहे, तर किती वीज निर्मिती होईल व त्याचा उपयोग हा कशासाठी करणार आहेत? तसेच या प्रकल्पामुळे स्थानिक शेतक-यांना काय फायदा होईल? हे दोन मुददे उपस्थित केले.

त्यावर पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पात सहवीज निर्मिती प्रकल्प कार्यरत असून २५.० मे.वॅट प्रकल्पाचे ३३.० मे.वॅटपर्यत विस्तारिकरण करण्यात येणार आहे व सदरील उत्पन्न केलेली वीज प्रथम कारखान्यामध्ये वापरण्यात येईल व जादाची वीज शासनाच्या ग्रीड ला जोडण्यात येईल म्हणून त्यास सहवीज निर्मिती प्रकल्प म्हणतात. साखर व आसवणी हे दोन्ही युनिट वेगळे असल्याने या दोन्ही विभागाकडून विस्तारीकरण करुन २५ मे. वॅट चे ३३.० मे. वॅट पर्यत करण्यात येणार असून त्यासाठी इंधन म्हणून बॅगस वापरण्यात येणार आहे असे सांगितले.

तसेच पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की या प्रकल्पामुळे सर्वात जास्त फायदा म्हणजे आपल्या परिसरात रोजगाराची निर्मिती होणार आहे व नविन रोजगाराच्या संधित स्थानिक लोकांनाच प्रकल्पात संधि देण्यात येईल. तसेच दुसरी गोष्ट स्थानिक शेतक-यांच्या ऊसाला अतिरिक्त भाव देता येईल व आसवणी प्रकल्प हा मल्टीफिड असल्याने, स्थानिक शेतकरी हे दुस-या पीकाचे उत्पादन घेऊ शकतात, त्यामुळे स्थानिक शेतक-यांना अतिरिक्त उत्पन्न मिळेल. या प्रकल्पात मका, ज्वारी, तांदूळ हे कच्चा माल

म्हणून लागणार आहेत व ऊसाचे पीक पुर्ण होण्यापर्यंत मका लावला, तर प्रकल्पात कच्चा माल म्हणून मका विकत घेता येईल त्यामुळे याचा शेतक-यांना फायदा होऊ शकतो.

३) **श्री रविंद्र रामचंद्र नाईक, ग्रामपंचायत सदस्य, मुक्काम पोस्ट – डोणेवाडी, तालुका-गडहिंग्लज, जिल्हा-कोल्हापूरः-**

प्रस्तावित आसवणी प्रकल्पात प्रतीदिन किती अल्कोहोल उत्पादन होणार आहे?

त्यावर पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की विस्तारिकरण प्रकल्पात अल्कोहोल हे ३०० किलो लिटर प्रतिदिन उत्पादन होणार आहे व सदरहू आसवणी प्रकल्प मल्टी-फिड असल्याने त्यासाठी कच्चा माल हा वेगवेगळा लागणार आहे. त्यामुळे कच्चा माल म्हणून धान्य वापरले तरी ३०० किलो लिटर प्रतिदिन उत्पादन, मोलॅसिस वापरले तरी ३०० किलो लिटर प्रतिदिन उत्पादन आणि ऊस वापरला तरी ३०० किलो लिटर प्रतिदिन उत्पादन मिळणार आहे. त्यामुळे प्रकल्पाची उभारणी ही ३०० किलो लिटर प्रतिदिन उत्पादनासाठीच करण्यात आलेली आहे.

४) **श्री विठ्ठल सुबराव पाटील, मुक्काम पोस्ट-किटवाड, तालुका-चंदगड, जिल्हा-कोल्हापूरः-**

या प्रकल्पातून आमच्या भागातील शेतक-यांना काय फायदा होईल?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की कुठलाही प्रकल्प सुरु केल्यानंतर स्थानिकांना होणार फायदा महत्वाचा आहे. येथे महत्वाचा फायदा म्हणजे प्रकल्पामुळे रोजगार निर्मिती होणार आहे ज्यामध्ये सद्या प्रकल्पात १,०४० लोक काम करत आहेत त्यात वाढ होईल व प्रकल्पात रोजगाराची संधि देताना स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल.

दुसरा फायदा म्हणजे कंपनीच्या उत्पन्नात वाढ झाल्याने कंपनीस शेतक-यांना ऊसासाठी अतिरिक्त भाव देता येईल त्यात आसवणी प्रकल्पाचा मोठा वाटा असेल.

तिसरा फायदा म्हणजे शेतकरी जे ऊसाचे एकच पीक घेतात, त्याऐवजी ऊसाबरोबरच दुसरे पीक घेता येईल व ज्यावेळी आसवणी प्रकल्प कार्यान्वित होईल, त्यावेळी त्यासाठी धान्य म्हणजे मका, ज्वारी किंवा तांदूळ लागेल. तर ऊस मोठा होत असताना जर मका लावला तर तो आम्ही आसवणी प्रकल्पात घेऊ शकतो. त्यामुळे आपणास त्याचा फायदाच होणार आहे.

५) **सौ. भारती रामचंद्र पाटील,मुक्काम पोस्ट-निट्टूर गाव, तालुका-चंदगड, जिल्हा-कोल्हापूरः-**

या प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगाराची संधि मिळेल काय?ती कोणाला देणार, बाहेरुन कामगार आणणार वा येथील स्थानिक घेणार?

विस्तारिकरण प्रकल्पामुळे रोजगाराची संधि उपलब्ध होतील व त्यामध्ये स्थानिकांनाच प्राधान्याने रोजगाराची संधि देण्यात येईल. जर एखाद्या पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक/तांत्रिक अहर्ता नसल्यास, त्यासाठी प्रशिक्षण योजना कारखान्यामार्फत तयार करुन ती स्थानिकांसाठी राबविण्यात येईल व त्यासाठी स्थानिक व्यक्तींना त्याबाबत सक्षम करण्यात येईल.

**६) श्री संजय सुतार, मुक्काम पोस्ट-राजगोळी बुद्रुक, तालुका-चंदगड, जिल्हा-कोल्हापूरः-**

राजगोळी गावात दोन्ही बाजूने प्रकल्पात ये-जा करणारी जड वाहने (Heavy Vehicles ) फिरतात तसेच कच्चा माल आणणारी रिकामी वाहने दोन्ही बाजूने जात असतात. त्याचा स्थानिकांना त्रास होत आहे त्यासाठी भविष्यात याबाबत प्रकल्प प्रशासनाचे काय नियोजन आहे?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू सूचना ही वाहतुक व्यवस्थापन अंतर्गत येत असल्याने त्याचे उत्तर हे प्रकल्प प्रवर्तक देतील.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की राजगोळी गावात वाहतुकीच्या त्रासाबाबत येथे सूचना करण्यात आलेली आहे. त्यासाठी प्रकल्पात येणारी जड वाहने (heavy vehicles) ही बायपास रस्त्याने जातील व लहान वाहने ही आतमध्ये गावात जातील अशा प्रकारची योजना करण्यात आलेली आहे कारण आम्हांला जागेची अडचण आहे असे सांगितले. तसेच जेथे शक्य आहे, तेथे डांबरीकरण करण्यात आलेले आहे व जर जागा उपलब्ध झाली, तर रस्त्याचे रुंदीकरण करुन भरलेल्या व रिकाम्या वाहनांचे वाहतूक व्यवस्थापन करु शकतो.

श्री संजय सुतार यांनी आक्षेप नोंदविला की एवढे वर्षे होऊन कंपनीने काहीही केलेले नाही. आता रस्ता झालेला आहे, आम्ही रस्त्यालगत राहत असुन आम्हांला कंपनीत येणा-या ट्रक्स, मोठी वाहने, ट्रॅक्टर यांच्या आवाजाचा खूपच त्रास होतो. याबाबत ब-याच वेळा तोंडी व लेखीस्वरुपात तक्रारी कंपनी प्रशासनास वेळोवेळी सादर केलेल्या आहेत. त्याबाबत पुढील उपाययोजना करण्यात याव्यात.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सकारात्मक कृती करण्याचे आश्वासन दिले.

**७) श्री विरुपाक्ष कुंभार, मुक्काम पोस्ट-राजगोळी खुर्द, तालुका-चंदगड, जिल्हा-कोल्हापूरः-**

प्रकल्प उत्पादनासाठी कारखाना कच्चा माल म्हणून धान्य घेणार आहे, म्हणजे मका, तांदूळ इ. ते धान्य कोणत्या भावाने घेणार? कारण उत्पादन खर्च, लागवड खर्च, मजुरी वाढलेली असल्याने शासनाच्या भावाने देणे शेतक-यांना परवडतच नाही. तसेच आता सरकारी हमी भाव हा भाताचा रुपये २,२००/- आहे व व्यापारी भातासाठी रुपये ३,०००/- देतात. तर कंपनी आमच्याकडून कच्चा माल म्हणून धान्य घेणार ते सरकारी हमी भावाने विकत घेणार का बाजारभावाने विकत घेणार? तसेच याबाबत कंपनीने धोरण तयार केलेले आहे का, कारण व्यवहारात दलाल येतात व शेतकरी दलालांच्या वागणुकीला कंटाळलेले आहेत. त्यापुढे कंपनी प्रशासनाने येथे दलाली करणारे ठेवू नयेत. कंपनीने प्रत्यक्ष खरेदी करावी, स्टॉकिस्ट नेमावे. शेतक-यांकडून प्रत्यक्ष (direct) खरेदी करावी.

त्यावर प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सर्वांनाच माहित आहे की शासनाच्या धोरणानुसार ऊसाला आम्हांला एफ.आर.पी. किंमतीप्रमाणेच घ्यावा लागतो परंतु कारखाना मक्याची खरेदी ही जो बाजारभाव असेल, त्याप्रमाणेच करणार आहोत. तसेच यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प व्यवस्थापनाने बाजारभावाप्रमाणे (market rate) मका घेण्याचे आश्वासन दिलेले आहे असे सांगितले. त्यापुढे प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की प्रकल्प पूर्णपणे कार्यरत झाल्यानंतर आम्हांला मक्याचे पीक रोज ६५० टन रोज लागणार आहे त्याचे प्रमाण (quantity) हे जास्त प्रमाणात आहे. तरी शेतक-यांकडून कंपनीने प्रत्यक्ष खरेदी करावी किंवा जास्तीचा मका कसा मिळेल यासाठी आम्ही सर्वेक्षण करणार आहोत तसेच जर कंपनी ३०० दिवस कार्यान्वित राहणार, तर आम्हांला

दर वर्षी २५० लाख मे.टन मका लागणार आहे. यासाठी कंपनी व्यावसायिक विभाग सुरु करणार असून प्रत्येक शेतक-याकडून प्रत्यक्ष मका कसा विकत घेता येईल याचा अभ्यास व नियोजन करणार आहोत. तर आम्ही स्थानिक शेतक-यांना विश्वासात घेऊन नियोजन करणार आहोत असे सांगितले.

**८) श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, तेलंगणा राज्यः-**

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी संबंधित व्यक्तीस थोडक्यात सूचना, आक्षेप नोंदविण्याची सूचना केली.

श्री सुनंदा रेड्डी यांनी कंपनी प्रशासन प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा राबविणार असणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पात पुनर्वापर करणे हे कौतुकास्पद आहे असे मत मांडले. त्याचप्रमाणे प्रकल्पात फळबाग झाडे लावणे, पावसाचे पाणी पुनर्भरण हेही कौतुकास्पद आहे व प्रकल्पात स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देणार आहेत.

त्यापुढे श्री सुनंदा रेड्डी यांनी सदरहू प्रकल्प हा शेतक-यांच्या हिताचा असल्याचे मत मांडले व पर्यावरण सल्लागार यांनी चांगल्याप्रकारे सर्वेक्षण केलेले आहे. तसेच त्यांनी प्रकल्प परिसरातील आरोग्याची स्थिती बाबत, पीकांबाबत सर्वेक्षण करण्याची सूचना केली. त्याचप्रमाणे प्रकल्प परिसरातील भूगर्भातील पाण्याच्या सद्यस्थितीबाबत सर्वेक्षण करण्यात यावे व जर शक्य असेल, तर प्रकल्प प्रवर्तकांनी परिसरातील तरुण-तरुणींसाठी कौशल्यविकास कार्यक्रम हाती घ्यावा. तसचे प्रकल्पाचे सीएसआर निधीच्या वापराबाबत एक समन्वयक समिती (co-ordination) स्थापन करण्यात यावी ज्यामुळे त्याचा फायदा स्थानिक तरुण-तरुणींना मिळेल आणि कंपनी प्रशासनाला विश्वासाहर्ता प्राप्त होईल. कंपनीस शक्य असल्यास विंडपॉवर व सोलरपॉवर सयंत्रणा कंपनीत स्थापित करुन त्या उर्जेचा उपयोग करण्यात यावा. तसेच प्रकल्प प्रशासनास विनंती आहे की प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प म्हणून राबविण्यात यावा.

प्रकल्प प्रवर्तक यांनी श्री सुनंदा रेड्डी यांचे योग्य सूचना दिल्यामुळे आभार मानले व श्री रेड्डी यांनी उपस्थित सूचनेनुसार कंपनीचे नियोजन आहे की सॅटेलाईट मॅपिंगव्दारे परिसरातील भूगर्भातील पाण्याची उपलब्धता तसेच त्यामुळे स्थानिक शेतक-यांना काय फायदा होईल असे सागितले. त्यापुढे प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की गेले ७-८ वर्षांचा विचार केला तर असता आम्ही सर्व शेतकरीबंधूसोबत एकत्र प्रयत्न करुन आम्ही २१२.० बिलियन लिटर पाण्याची बचत केलेली आहे त्याचा आमच्याकडे थर्ड पार्टी ऑडिट अहवाल आहे.

श्री सुनंदा रेड्डी यांनी कौशल्यविकास प्रशिक्षण बाबत सूचना केलेली आहे. तर येथील सर्व ग्रामस्थांना माहित आहे की ओलम ग्लोबलतर्फे वसंतदादा साखर संस्था, मांजरी, जिल्हा-पुणे यांच्यातर्फे चार शास्त्रज्ञ हे दर महिन्यास आमच्या येथे येतात व परिसरातील शेतक-यांना तांत्रिक प्रशिक्षण त्यांच्या शेतात दिले जाते. तसेच शेतातील उत्पादकता कशी वाढविता येईल, त्यासाठी तेथील मातीच्या पोतानुसार कुठले खत वापरावे, कसे उत्पादन वाढेल व " Climate Smart Agriculture" under CSA Programme आम्ही शेतक-यांना शिक्षण देत आहोत. त्यापुढे आम्ही एक मायक्रो वेदर स्टेशन (micro weather station) स्थापित करणार आहोत व त्यानुसार शेतक-यांना आगाऊ सूचना देण्यात येईल की शेतीला केव्हा व किती पाणी द्यायचे आहे. त्यामुळे मायक्रो वेदर स्टेशन हे शेतक-यांना एक सल्लागार

संस्था म्हणून काम करेल. त्यापुढे त्यांनी सांगितले की, सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे आम्ही सतरा देशात कार्यरत आहोत व पर्यावरण संरक्षण व संवर्धन हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. शेतक-यांचा विकास हेच आमचे ध्येय आहे.

**९) श्री आर. वेंकटेश, पर्यावरणवादी, हैद्राबाद राज्यः-**

हरितपट्टा विकसित करताना रोपटी व लहान झाडांना ट्री गार्ड लावण्यात यावेत. त्यामुळे त्या झाडांचे संरक्षण होईल व स्थानिकांना प्रकल्पात रोजगारी संधी देण्यात यावी ज्यामुळे येथील बेरोजगारांना रोजगार मिळेल या माझ्या सूचना आहेत असे नमुद केले.

त्यावर प्रकल्प सल्लागार यांनी सूचनेची नोंद घेतल्याचे सांगितले.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

**१०) श्री यल्लापा पुन्नाप्पा भरमगावडा, मुक्काम पोस्ट-राजगोळी बुद्रुक, तालुका-चंदगड, जिल्हा-कोल्हापूर, शिवा सोसायटी संचालकः-**

प्रस्तावित प्रकल्पात भूमीपुत्रांना न्याय देण्यात यावा व त्यासाठी प्रकल्पात ८०% स्थानिकांनाच रोजगाराची संधि देण्यात यावी. तसेच प्रकल्पाचा सीआरएस निधी ही अद्यापपावेतो कधीही राजगोळी बुद्रुकला मिळालेला नाही तरी सीएसआर निधी राजगोळी बुद्रुकसाठी खर्च करण्यात यावा. त्याचप्रमाणे पर्यावरणाचा विचार केल्यास प्रकल्पासाठी जे ट्रॅक्टर, जड वाहने येतात, त्याचा आमचा गावाला भरपूरच त्रास आहे व आमच्या गावाच्या बाजूस पर्यायी रस्ता आहे तरी त्या पर्यायी रस्त्यावरुन वाहतुक करण्यात यावी असे सांगितले.

त्यावर प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर देताना सांगितले की श्री यल्लपा भमरगौडा यांनी राजगोळी बुद्रुकला सीआरएस निधी न मिळाल्याची तक्रार केलेली आहे. तर माझ्या माहितीनुसार आम्ही राजगोळी गावात एक मैदान विकसित केलेले आहे. तसेच जसे प्राधान्य मिळते, त्याप्रमाणे कामे करण्यात येतात व यापूर्वी आम्ही १४ लाख रुपये खर्च करुन चन्नेहट्टी गावात एक शाळा बांधून दिलेली आहे. तसेच प्रकल्पाच्या शेजारी गणेशवाडी हे गाव आहे तेथे आम्ही सोलर दिवे लावत आहोत, त्यासाठी सुमारे ८-१० लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत. तर आम्ही प्रथम कुठल्या सामाजिक कामांची गरज आहे, त्याचे मुल्यांकन करुन नंतर प्राधान्याप्रमाणे त्या त्या गावात कामे करण्यात येतात. त्यापुढे त्यांनी सांगितले की, परिसरातील ४-५ शाळांकडून आमच्याकडे विनंती करण्यात आलेली होती की त्या शाळांमध्ये मुलामुलींचे सहशिक्षण (Co-education) आहे तर तेथे मुलींसाठी स्वच्छतागृह नाहीत. तर त्यातील चार शाळांमध्ये आम्ही मुलींसाठी स्वच्छतागृह बांधत असून त्यात राजगोळी बुद्रुक गाव आहे. तरी जशी स्थानिकांची विविध सामाजिक कार्यासाठी मागणी येईल, त्यास प्राधान्याप्रमाणे प्रकल्पाकडून ते काम करण्यात येईल.

११) **श्री भावकु गुरव, मुक्काम पोस्ट-राजगोळी बुद्रुक, तालुका-चंदगड, जिल्हा-कोल्हापूर, गडहिंगल्ज बाजार समिती संचालक:-**

प्रकल्प प्रवर्तकांना सूचना करण्यात येते की प्रकल्प परिसरात वाडयावस्त्या, खेडेगावे आहेत. तर प्रकल्प व्यवस्थापनांनी प्रकल्प परिसरात आरोग्य शिबिर राबविणे हे आवश्यक आहे. ही विनंती.

प्रकल्प प्रवर्तक यांनी आरोग्य शिबिर राबविण्याचे आश्वासन दिले.

१२) **सौ. अनिता अर्जून पाटील, मुक्काम पोस्ट-चिंचणे, तालुका-चंदगड, जिल्हा-कोल्हापूरः-**

ऊस वेळेवर नेला जात नाही. तरी याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी असा मुददा मांडला.

त्यावर प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रकल्पाचे विस्तारिकरण झाल्यानंतरच याबाबत प्रश्न सुटतील व विस्तारिकरणानंतर ऊस वेळेवर घेतला जाऊ शकेल.

१३) **श्री जगन्नाथ साळुंखे, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूरः-**

यांनी जनसुनावणीस महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेला आहे, त्याबद्दल त्यांचे स्वागत करुन त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रश्न केला की आपण साखर कारखान्याची गाळप क्षमता ही ४,९६०.० टन प्रतिदिन पासून १०,०००.० प्रतिदिन पर्यत विस्तारित करण्याचे नियोजित केलेले आहे. तर वसंतदादा शुगर संस्थेतर्फे ऊसाच्या कोणत्या पेशी चांगल्या, त्यासाठी कोणती माती आवश्यक, तर मातीचे परिक्षण करण्यात आलेले आहे काय? त्यासाठी गावोगावी कार्यशाळा प्रकल्प प्रवर्तकांनी आयोजित करणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्पात कच्चा माल म्हणून मका लागणार आहे त्यासाठी मक्याचे कोणत्या पेशी चांगल्या, त्या पेशी कोणत्या गुणवत्तेच्या आहेत, त्यास कोणत्या खत्याची आवश्यकता आहे, याचा अभ्यास प्रकल्पातर्फे करण्यात येणे आवश्यक असून तो स्थानिक शेतक-यांना उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्यापुढे प्रकल्पात पोटॅश निर्मिती करण्यात येणार आहे व पोटॅश ही मातीसाठी अतिशय चांगला आहे. त्यापुढे त्यांनी सांगितले की मातीचे परिक्षण झाल्यानंतर पोटॅश सवलतीच्या दरात स्थानिक शेतक-यांना उपलब्ध करणे आवश्यक आहे. ते देणार आहेत काय? हे प्रश्न शेतक-यांच्या हिताचे आणि प्रकल्पास आवश्यक असणा-या कच्चा मालासंदर्भातील मुद्दे आहेत. प्रकल्पाचे उत्पादन वाढले पाहिजे आणि त्याचा फायदा हा शेतक-यांना झालाच पाहिजे. त्याबाबत माहिती देण्यात यावी.

त्यावर प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की विविधतेसाठी (variety) २-३ संस्था येथे कार्यरत आहेत. त्यात व्ही.एस.आय, मांजरी, जिल्हा-पुणे,एस.बी.आय, कोईमतुर, उत्तर भारतातील एक संस्था आहे. त्यामध्ये आम्ही १५ विविध ऊसाचे वाण आणलेले आहेत व त्याची चाचणी आम्ही प्रकल्पातच घेतलेली आहे तसेच त्याबाबत आमचा तपशीलवार अभ्यास चालू आहे. त्यातील सर्वात उत्तम ऊसाचे वाण आम्ही सवलतीच्या दरात प्रत्येक शेतक-याला कसे देता येईल याबाबत नियोजन करण्यात येत आहे. तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की माती परिक्षणाचे महत्व फारच महत्वाचे आहे. तर त्यासाठी आमच्या प्रकल्प क्षेत्रात आमचे दहा गट कार्यालये आहेत व त्या दहा गट कार्यालयात आम्ही माती परिक्षण मशिन्स (Soil Testing Machines) आणणार आहोत. कारण सद्यस्थितीत मातीचा नमुना

घेतल्यानंतर ते कोल्हापूरला पाठवावे लागतात व त्याचा अहवाल येण्यासाठी १५-२० दिवस लागतात त्यामुळे पीक लागवडीचा वेळ निघून जाते असे सांगितले. तर त्यासाठी शेतकी तांत्रिक सेवा पुरवठादार (Agri Technical Service Providers) असतात, त्यांच्या मदतीने आम्ही माती परिक्षण मशिन्सच आमच्या गट कार्यालयात स्थापित करणार आहोत. तसेच आम्ही नियोजन करत आहोत की प्रत्येक मोसमात आम्ही किती शेतातील मातीचे नमुने परिक्षण करावयाचे आहेत? ते स्थानिक शेतक-यांसोबत सवलतीच्या दराने करणार आहोत. त्यांच्या एनपीके अहवालानुसारच शेतक-यांना कुठले खत किती प्रमाणात वापरायचे याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल व यासाठी एक आय.टी. कंपनीसोबत (Vibrant Company) आम्ही आमचे सॉफ्टवेअर विकसित करत आहोत. त्यानुसार संबंधित शेतक-यांने जर आमच्या प्रकल्पासोबत जर नोंदणी (registration) केलेली असेल आणि त्याने ऊसाची किंवा मक्याची लागवड केलेली असेल, तर त्या शेतक-यास पूर्णपणे बारा महिन्याचे क्रॉप कॅलेन्डर बाबत त्या शेतक-याच्या मोबाईल फोनवर संदेश जाईल. तसेच शेतक-यांना क्रॉप कॅलेन्डर बाबत सर्व माहिती स्वयंचलित (automatic) जाईल आणि त्या सॉफ्टवेअर विकसित केल्याने आमची ही प्रक्रिया सोपी व सहज होईल. त्यापुढे पोटॅशबाबत माहिती देत असताना त्यांनी सांगितले की सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे स्पेंट वॉश हा पोटॅशमध्ये उच्च प्रतीचा असतो त्यामुळे बॉयलरमधून जी राख बाहेर येईल, त्याच्या ब्रिकेट्स तयार करण्यात येतील आणि येथील स्थानिक शेतक-यांना पोटॅशच्या रुपात सवलतीच्या दरात देण्यात येईल त्याबाबतचे नियोजन आम्ही केलेले आहे कारण ऊसाच्या शेतीसाठी पोटॅशचे महत्व खूपच आहे.

**१४) <u>सौ. सविता तानाजी पाटील, राहणार-चिंचणे गाव, तालुका-चंदगड, जिल्हा-कोल्हापूर</u>:-**

कारखान्यातून निर्माण होणा-या सांडपाण्याचा पुर्नवापर करणार असल्याचे सांगितले आहे. तर तो कशाप्रकारे करण्यात येईल याची सविस्तर माहिती देण्यात यावी?

त्यावर पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की साखर कारखान्यात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रकल्पात औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सनियंत्रण यंत्रणा (Effluent Treatment Plant) आहे. त्यात सांडपाण्यावर प्राथमिक (primary), व्दितीय (secondary) आणि टशरी (tertiary) प्रक्रियेनंतर सांडपाण्यावर आर.ओ. (Reverse Osmosis) मध्ये प्रक्रिया करण्यात येऊन त्या प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येणार आहे.

तसेच प्रकल्पात आसवणी प्रकल्पातील सांडपाणी हे इन्सिनरेशन बॉयलरमध्ये जाळण्यात येईल आणि सांडपाण्यातील जे पाणी निघेल, ते सीपीयु मध्ये प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर करण्यात येईल त्यामुळे सांडपाण्याचा एकही थेंब हा प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही.

त्यापुढे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की साखर विभागातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी ईटीपी, तर आसवणी विभागातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सीपीयु आहे. दोन्ही विभागात प्रक्रियेसाठी वेगळी युनिट असतील, त्यामुळे सांडपाण्यावर प्रक्रिया ही चांगली करण्यात येईल व सांडपाणी हे बाहेर सोडण्यात येणार नाही त्यामुळे परिसरातील नागरिकांना कोणताच त्रास होणार नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की ब-याच उपस्थितांनी त्यांच्या सूचना, आक्षेप नोंदविलेले आहेत. तरी आपण जनसुनावणीच्या समारोपाकडे जात आहोत.

अध्यक्ष यांनी समारोप करताना सांगितले की केंद्र सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी पारित केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार बैठकीच्या तीस दिवस अगोदर एक स्थानिक वृत्तप्रत्रात आणि एक राष्ट्रीय वृत्तपत्रात पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. त्यात जनसुनावणीचे स्थान आणि वेळ ही जनतेच्या माहितीसाठी प्रकाशित करण्यात आलेली होती. त्याप्रमाणे आज जनसुनावणी ही त्या स्थानावर व वेळेवर सुरु करण्यात आली. तसेच प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरणात प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सविस्तर माहिती दिलेली आहे व नागरिकांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना,टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविलेले आहेत. त्यास प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी स्पष्टीकरण दिलेले आहे. बैठकीत स्थानिकांनी उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा बैठकीच्या इतिवृत्तात समावेश करण्यात येईल व बैठकीचे इतिवृत्त, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्यातर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल व तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेईल.

त्यापुढे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सूचना केली की बैठकीत पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत जे आश्वासन देण्यात आलेले आहे, त्याबाबत तंतोतंत पालन करण्यात यावे व अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

प्राप्त झालेल्या ०३ लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडलेल्या आहेत.

**(प्रमोद माने)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर

**(जगन्नाथ साळुंखे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर

**(अमोल येडगे, भाप्रसे)**
अध्यक्ष
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
जिल्हादंडाधिकारी.कोल्हापूर
जिल्हा-कोल्हापूर